अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २३ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३५५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## बाल वारकऱ्यांनी केली चंद्रभागेची स्वच्छता

**पंढरपूर** : उजनीचे पाणी पोहचण्याआधी शेकडो बाल वारकऱ्यांनी चंद्रभागेची स्वच्छता केली आहे. उजनीच्या धरणातून पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा या शहरांसाठी भीमा नदीमधून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. तर हे पाणी उजनी धरणापासून ३० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या नीरा नरसिंहपूर येथे ३३ तासानंतर पाणी पोहचले. या पाण्याचा पुढचा थांबा हा पंढपूर असणार आहे. दरम्यान हे पाणी चंद्रभागेत येण्याआधी चंद्रभागेची स्वच्छता शुक्रवारी सकाळी वारकरी शिक्षण संस्थेच्या बाल वारकऱ्यांनी केली. जेव्हा उजनीचे स्वच्छ पाणी चंद्रभागेमध्ये येईल तेव्हा नदीतील घाणीमुळे ते पाणी देखील प्रदुषित होईल. हीच बाब टाळण्यासाठी बाल वारकऱ्यांनी ही मोहीम हाती घेतली.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**मोहोळ** : हायवे रोड ओलांडत असताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एक जण जागीच ठार झाला. ही घटना सोलापूर पुणे महामार्गावर खंडाळी पाटी (ता.मोहोळ) जवळ घडली. शंकर सखाराम माने वय ५८ वर्षे (रा.खंडाळी ता. मोहोळ) हे खंडाळी पाटी जवळ सोलापूर पुणे महामार्गावर रस्ता ओलांडत असताना पुणे कडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली आणि वाहनाचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेले.त्यामुळे ते गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले. वाहनचालक अपघाताची खबर न देता पळून गेला. अज्ञात चालकाविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात धर्मा वसंत माने यांनी फिर्याद दिली आहे. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पीएसआय पवार करीत आहेत.

## सुडाचे राजकारण पेटले...



# काकांच्या गटाभोवती पुतण्याने पेरले सुरूंग

## ‘त्या’ १० आमदारांवर टांगती तलवार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यात कुरघोडीचे राजकारण पराकोटीला चालले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेवरची सुनावणी घेण्यास सभापती राहुल नार्वेकर यांनी तातडीचे पाऊल टाकलेले असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पवार- पवार या काका -पुतण्याच्या दोन गटात पुन्हा धुमश्चक्री सुरू झाली आहे.काकांना जशास तसे उत्तर देण्याचा पुतण्याने जणू चंगच बांधला आहे. पक्षाचा आदेश मोडल्याबद्दल शरदरावांच्या गटातील त्या १० आमदारांना अपात्र ठरवण्याची याचिका अजितदादांच्या गटाने सभापती नार्वेकर यांच्याकडे दाखल केल्याने शरदराव यांच्या गटात खळबळ माजली आहे. काकांच्या गटाभोवती खुद्द पुतण्यानेच सुरूंग पेरले.त्याचा विस्फोट कधी होणार हे लवकरच पहायला मिळेल.दरम्यान अजित पवार हे ब्लॅकमेलिंगचे राजकारण करत असल्याचा आरोप आ.रोहित पवार यांनी केल्यामुळे पवार फॅमिलीत पुन्हा फ्रीस्टाईल वाढत चालली आहे.**

अजितदादा हे ९ आमदारांना सोबत घेवून शिंदे-फडणवीस यांच्या सरकारमध्ये सामील झाल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस कुणाच्या ताब्यात यावरून पवार फॅमिलीत वाद सुरू झाला आहे.तो संपण्याची चिन्हे दिसत नाहीत.उलट वाढत चालला आहे.शरदराव म्हणतात मीच किंग तर अजितदादा म्हणतात,पक्षाचा प्रमुख मीच.काका-पुतण्या यांच्यात एकमेकांना शह देण्याचे उद्योग सुरू आहेत.काही दिवसांपर्वी शरदरावांच्या गटाकडून अजितदादांच्या गटातील आमदारांना पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल अपात्र ठरवण्याची याचिका या गटाकडून दाखल करण्यात आली आहे.त्याला जशास तसे उत्तर देण्यासाठी अजितदादांच्या गटाने शरदरावांच्या गटाविरूद्ध याचिका दाखल केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

शरदराव गटाकडून अजितदादा गटाच्या विरोधात कारवाईला वेग आल्यानंतर आमच्या विरोधात याचिका दाखल केल्या म्हणून आम्ही देखील शरद पवार गटातील आमदारांच्या विरोधात याचिका दाखल केल्या, अशी प्रतिक्रिया अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.त्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, रोहित पवार, राजेश टोपे, अनिल देशमुख, संदीप क्षीरसागर, मानसिंग नाईक,प्राजक्त तनपुरे, रवींद्र भुसारा आणि बाळासाहेब पाटील यांचा समावेश आहे. आमदार नवाब मलिक, आमदार सुमन पाटील, आमदार अशोक पवार आणि आमदार चेतन तुपे यांचं नाव वगळण्यात आलं आहे. नवाब मलिक आणि चेतन तुपे यांनी आपली भूमिका अद्यापही जाहीर केली नाही.

### आणखी एक खासदार अजित पवारांकडे





एकीकडे अजित पवार गटाच्या वतीने शरद पवार गटातील आमदारांविरोधात कारवाई सुरू असताना दुसरीकडे शरद पवार गटातील एका खासदाराने आणि एका आमदाराने अजित पवार गटाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे आता शरद पवार गटांमध्ये दहा विधानसभेचे आमदार आणि लोकसभेची एकूण तीन खासदार शिल्लक राहिले आहेत.या दोघांनीही त्यांचे प्रतिज्ञापत्र अजित पवारांकडे दिल्याची माहिती आहे. त्यामुळे अजित पवारांना समर्थन देणारा तो खासदार कोण... अमोल कोल्हे की श्रीनिवास पाटील? याची उत्सुकता लागली आहे. राष्ट्रवादीच्या राज्यसभेतील खासदार वंदना चव्हाण किंवा फौजिया खानही सध्या शरद पवारांसोबत असून त्यांच्यापैकी एक खासदार तर नसेल अशीही चर्चा आहे.

### ब्लॅकमेलिंगचा आरोप



शरद पवार गटातील आमदारांना ब्लॅकमेल करण्याचा प्रकार होत असल्याचा आरोप आ.रोहित पवार यांनी केला आहे. जाणीवपूर्वक आमदारांची विकास काम अडवून त्यांना आपल्यासोबत घेण्याचे काम सुरू आहे. पाठिंब्याच्या प्रतिज्ञापत्रावर सही कर...अन्यथा तुझे काम होणार नाही,अशी दमबाजी अजित पवार हे आमच्या गटातील आमदारांना करत आहेत.निवडणुकीनंतर कोण कुणाच्या बाजुने हे कळेल,असेही रोहित पवार म्हणाले.

### अजितदादांची चलाखी

नुकतेच अजित पवार गटाकडून शरद पवार गटातील आमदारांना अपात्र ठरवा अशी मागणी विधीमंडळ कोर्टमध्ये करण्यात आली आहे. त्यानंतर ही माहिती समोर आली आहे. अजित पवार गटाला समर्थन करणारा हा खासदार आणि आमदार सध्या शरद पवार गटामध्ये असला तरी योग्य वेळी आपली भूमिका स्पष्ट करणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधित आमदाराला आमदाराला वगळून अजित पवार गटाकडून उर्वरीत १० आमदारांविरोधात विधीमंडळात कारवाईसाठी याचिका दाखल करण्यात आली आहे.

## बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र बनविणाऱ्यास अटक

सुराज्य/अक्कलकोट

चारित्र्य पडताळणीचे बनावट प्रमाणपत्र बनवणाऱ्या उत्तर सोलापूर तालुक्यातील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र हे संबंधीत पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक कार्यालयाकडील जिल्हा विशेष शाखेकडून देण्यात येते. पाकणी येथील एक इसम बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देत असल्याची माहिती प्राप्त होती.



बनावट प्रमाणपत्र देण्याऱ्या इसमांचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेस सूचना दिल्या होत्या. त्यावरून पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर,स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सब इन्स्पेक्टर शैलेश खेडकर यांनी सदर बातमीची पडताळणी केली. पाकणी येथील एक इसम पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आलेल्या चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्रामध्ये फेरफार करून व त्यावरील डिजीटल सिग्नेचरच्या चिन्हाचा फसवणुकीकरीता गैरवापर करून बनावट प्रमाणपत्र देत असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आरोपी विशाल भारत येलगुंडे (वय ३३) यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल झाला. पो. हे.कॉ. चंद्रकांत बाबूराव पवार यांनी सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याला २५ सप्टेंबर पर्यंत पोलीस कस्टडीत रवानगी करण्यात आली आहे. ही शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, हिंमत जाधव, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि शिवाजी जायपत्रे, पांगरी पोलीस ठाणे, पोसई शैलेश खेडकर, सहाय्यक फौजदार नीलकंठ जाधवर, हरिदास पांढरे, चंद्रकांत पवार, आबासाहेब मुंढे, पोलीस अंमलदार विलास लोखंडे व काकडे यांनी पार पाडली आहे.

## उत्तरा बरसल्या; बार्शीत मंडळात अतिवृष्टी

सुराज्य/बार्शी

सुमारे तीन आठवड्याच्या खंडानंतर बार्शी शहर व तालुक्यात उत्तरा नक्षत्राच्या पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पावसाअभावी कोमेजलेल्या पिकांना आधार मिळाला.

बार्शी तालुक्यात मात्र हा पाऊस सर्वदूर समान नव्हता. कुठे अधिक तर कुठे कमी असा असमान पावसाची नोंद झाली. बार्शी मंडळात तब्बल ८१.३ मिलीमीटर इतकी म्हणजेच अतिवृष्टीची नोंद झाली आहे तर आगळगांव मंडळात अवघा ३.५ मिमी पाऊस झाला आहे.

### विविध मंडळात झालेला पाऊस : मिमीमध्ये

बार्शी : ८१.३, आगळगांव : ३.५, वैराग : ८.८, उपळे दु : ४४.८, गौडगांव :८.८ , पांगरी : ५.५, पानगांव : ३४.८, नारी :४३.३, सुर्डी : ६.३, खांडवी : १८.५



बार्शी तालुक्यात दि. २३ रोजी सकाळी संपलेल्या २४ तासात सरासरी २५.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

यंदाची पावसाळयाची सुरूवातच मृगाच्या कोरड्या सलामीने झाली. त्यानंतरची ही बहुतांश सर्व नक्षत्रे कोरडीच गेली. एखाद दुसरा पडलेल्या पावसावर पेरण्या झाल्या तर त्यानंतरही पावसाने सातत्याने हुलकावणी दिल्याने खरीप पिके पाण्याअभावी कोमेजून गेली. गुरूवार दि. २१ रोजी दुपारपासून वातारवणात बदल जाणवू लागला. दुपारनंतर आभाळ भरून आले अन पावसाला सुरूवात झाली तसे शेतकरी, व्यापारी बांधवांमध्ये चैतन्य पसरले. बार्शी शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात उत्तरा नक्षत्राचा पाऊस झाला. यामुळे खरीप पिकांना आधार झाला आहे. कांही ठिकाणी नदी, नाले, ओढ्यांना पाणी आले.

## विडी घरकुलजवळ तरुणीवर अत्याचार; गुन्हा दाखल

**सोलापूर** : इच्छेविरुद्ध जबरदस्ती करून घरकुल जवळ असलेल्या जंगलात तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी वाईन शॉप मध्ये काम करणाऱ्या युवकांवर गुन्हा दाखल झाला.

शंकर परमेश्वर फटाटे या २५ वर्षीय तरूणाने अल्पवयीन मुलीस फुस लावून अत्याचार केला.ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.ही एमआयडीसी पोलीस ठाण्यात या तरुणाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. स.पो.नि. चौधरी तपास करत आहे.

## आगामी लोकसभा निवडणूक एकत्र लढवणार!

सुराज्य/बंगळुरु

### जेडीएस-भाजपा यांच्यात युती

कर्नाटकच्या विधानसभा निवडणुकित भाजपा आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) अर्थात जेडीएस पक्षाचा पराभव झाला. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले. दरम्यान, काँग्रेस, भाजपा आणि जेडीएस या तिन्ही पक्षांना २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीचे वेध लागले आहे. येथे काँग्रेसला पराभूत करण्यासाठी भाजपा आणि जेडीएस पक्षांकडून विशेष रणनीती आखली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून या दोन्ही पक्षांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. शनिवारी दिल्लीमध्ये भाजपाने जेडीएस पक्षाशी युती झाल्याची घोषणा केली.कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री तथा जेडीएस पक्षाचे नेते एचडी कुमारस्वामी यांनी आज केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे नेते अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीनंतर नड्डा यांनी एक्सवर (पूर्वीचे ट्विटर) या युतीची घोषणा केली. नड्डा यांनी अमित शाह तसेच कुमारस्वामी यांच्यासोबतचा एक फोटो एक्सवर पोस्ट केला आहे. तसेच या पोस्टमध्ये जेडीएस पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग होण्याचा निर्णय घेतला आहे.

## शमी, गिल, ऋतुराज चमकले पहिल्या वनडेत भारताचा विजय

सुराज्य/मोहाली

मोहमंद शमीने घेतलेल्या पाच विकेटनंतर ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल आणि कर्णधार लोकेश राहुल, सूयकुमसा यादव यांच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियावर विजय ५ विकेटने मिळवला. तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे.




विजयासाठी २७७ धावांचा पाठलाग करताना ऋतुराज गायकवाडने ७१, शुभमन गिलने ७४ धावा केल्या. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १४२ धावांची भागिदारी केली. त्यानंतर कर्णधार राहुलने नाबाद ५८ तर सूर्यकुमार यादवने ५० धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

मोहमंद शमीने १० षटकात ५१ धावा देत ५ विकेटस मिळवल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला ३०० चा टप्पा गाठता आला नाही. ऑस्ट्रेलियाने २० षटकात सर्वबाद २७६ धावा केल्या. सलावमीवर डेव्हीड वॉर्नरने ५३ चेंडूत ५२, स्टिव स्मिथने ४१ धाव केल्या. जोश लिंगचे ४५ तर मार्क स्टॉयनिसने २९ तर कर्णधार पॅट कमिन्सने झटपट २१ धावा केल्या. शमीने ५ तर बुमराह अश्विन आणि जडेजाला प्रत्येकी एक विकेट मिळाली. दरम्यान या सामन्यात वॉर्नरने दोन षटकार ठोकले होते. यासह त्याने वनडेत १०० षटकारांचा टप्पा गाठला. हा कामगिरी करणार तो ऑस्ट्रेलियाचा सातवा क्रिकेटपटू ठरला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, चला 'स्मार्ट' देखावे पाहूया!

| कल्याण |
|---|
| 144-95-159 |
| **मुंबई** |
| 366-51-245 |

## शिंदे गटाच्या अपात्र प्रकरणाची सोमवारी सुनावणी

### सभापती राहुल नार्वेकर ॲक्शन मोडवर

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सुप्रीम कोर्टाने कानपिचक्या दिल्यानंतर विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटातील त्या १६ आमदारांच्या अपात्रतेवरची सुनावणी घेण्यास तातडीने पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे.नवी दिल्लीत कायदेतज्ज्ञांशी चर्चा करून मुंबईत आल्यानंतर नार्वेकर यांनी यासंदर्भात काही महत्वाची विधाने केली आहेत.याप्रकरणाची सुनावणी सोमवार दि.२५ सप्टेंबर रोजी ठेवण्यात आल्याचे वृत्त आहे.**



नार्वेकरांनी राजधानीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांची भेट घेतली व शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील प्रकरणावर चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणावर सुनावणी घेण्यास नार्वेकर यांच्याकडून दिरंगाई होत असल्याचा ठपका सुप्रीम कोर्टाने ठेवला होता.त्यानंतर नार्वेकर हे तातडीने दिल्लीला रवाना झाले.त्यामुळे राज्यात राजकीय चर्चेला उधाण आले होते.

दिल्लीत जाऊन नार्वेकर यांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांची भेट घेत शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील प्रकरणावर चर्चा केली असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या प्रकरणाच्या निकालासंदर्भात चर्चा केल्यानंतर आता नार्वेकर पुढे काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणाची एका आठवड्यात सुनावणी घ्या आणि दोन आठवड्यानंतर काय कार्यवाही केली याबद्दल माहिती द्या, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने विधानसभाध्यक्षांना दिले होते. त्यानंतर नार्वेकरांच्या हालचालींना जोरदार वेग आला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी आम्ही तीन महिन्यांची मुदत दिली नव्हती. मात्र, न्यायालयाच्या निर्णयाचा अध्यक्षांनी मान राखयला हवा होता. आमदार अपात्रता प्रकरणावर आठवडाभरात सुनावणी घेण्यात यावी, तसेच पुढील दोन आठवड्यांनी होणाऱ्या सुनावणीवेळी हा खटला किती दिवसांत निकाली काढणार, याचे वेळापत्रकही देण्यात यावे, असा आदेश दिला आहे.

### दिरंगाई नाही, घाई देखील नाही

दिल्लीत कायदेतज्ज्ञांशी चर्चा करून मुंबईत परतलेल्या नार्वेकर यांनी निर्णय करायला मी कसलीही दिरंगाई करणार नाही, तसेच कुठच्याही प्रकारची घाईही करणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. अपात्रता प्रकरणाची सुनावणी येत्या सोमवारी (ता. २५ सप्टेंबर) ठेवली आहे. त्यावेळी नार्वेकर हे दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतील, तसेच दोन्ही गटांची कागदपत्रे एकमेकांना पाहण्यासाठी देण्यात येण्याची शक्यता आहे.